**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार**

**तक्रार क्र.६८६ /६/२०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा तक्रारकर्ता**
कु.वर्षा विठ्ठलराव कडु,
व्दारा-श्री.यु.बी. पाचपोर,
सन्मती कॉलनी, शेगांव रोड, वि.म.वि.
अमरावती, ता.जि.अमरावती.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र लोक सेवा आयोग,
महात्मा गांधी मार्ग, बँक ऑफ इंडिया इमारत,
३ रा माळा, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र लोक सेवा आयोग,
महात्मा गांधी मार्ग, बँक ऑफ इंडिया इमारत,
३ रा माळा, मुंबई.

**(आदेश पारीत दिनांक ०३/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा तक्रारकर्ता कु.वर्षा विठ्ठलराव कडु हया हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, महाराष्ट्र लोक सेवा आयोग, मुंबई श्री.सं.पा. देशमुख हे हजर आहेत.

अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली असुन अर्जदाराचे समाधान झाले. अर्जदाराने या आयोगाकडे तक्रार करण्यापुर्वी अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल करायला पाहिजे होते. परंतु असे झाले नसले तरी तक्रारीच्या माध्यमातुन अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली आहे. तसेच अर्जदाराचे सदर विषयासंदर्भात महाराष्ट्र प्रशासकिय प्राधिकरण, नागपुर येथे प्रकरण चालु आहे.

वरील बाबी लक्षात घेता सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार**

**तक्रार क्र. ६८७/२०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा तक्रारकर्ता**
श्री.सुधाकर भिवसन वानखडे,
रा.रमेश नगर, डाबकी रोड, अकोला,
ता.जि. अकोला.
**विरुध्द**
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय,
बार्शीटाकळी, ता.बार्शीटाकळी, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक ०३/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा तक्रारकर्ता श्री.सुधाकर भिवसन वानखडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे मंडळ अधिकारी, खेर्डा बु. श्री.जे.एल. राठोड, हे हजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगासमोर ज्या माहिती संबंधी तक्रार केली, ती माहिती अर्जदाराला पुरविण्यात आली नाही. उत्तरवादी तथा मंडळ अधिकारी, श्री.जे.एल.राठोड हे हजर आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराला मौजा वडगांव स.नं.२६ /१ ई च्या फेरफार संबंधी कार्यवाही पाहिजे. त्यांनी हयाबाबत तत्कालीन तलाठी व मंडळ अधिकारी यांचेकडे कागदपत्रे पुरविली होती. सदर कागदपत्रे २ वेळेला पुरवून सुध्दा अर्जदाराच्या अर्जावर कुठल्याच प्रकारची कार्यवाही झालेली नाही. तसेच तत्कालीन तलाठी व मंडळ अधिकारी हे बदलुन गेलेले आहे. तरी, आज कार्यरत असलेले तलाठी श्री.डी.पी. चौधरी तसेच मंडळ अधिकारी, श्री.जे.एल. राठोड हे हजर आहेत. अर्जदाराने त्यांना कागदपत्रे दिल्यास त्यावर १५ दिवसात ते निर्णय देतील. तरी, अर्जदाराने आज पासुन २ दिवसात संबंधितांना कागदपत्रे दयावीत व तलाठी / मंडळ अधिकारी यांनी कागदपत्रे मिळाल्याची पोच अर्जदारास दयावी व त्यानंतर नियमानुसार कार्यवाही करुन अर्जदारास अवगत करण्यात यावे. त्यानंतरही अर्जदाराची काही तक्रार राहील्यास या आयोगासमोर तक्रार करता येईल.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार**

**तक्रार क्र. ६८८/७/२०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा तक्रारकर्ता**
श्री.रहमान खान नुर खान,
निवृत्त प्राचार्य बाराभाई मोहल्ला,
मु.पो.ता. दिग्रस,यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य),
जिल्हा परिषद, यवतमाळ.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, बाबा कंबलपोश उर्द हायस्कुल,
आर्णी, ता.आर्णी, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक ०३/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा तक्रारकर्ता यांचे वतीने त्यांचे चिरंजीव श्री.मोहीन अहमद खान हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे कनिष्ठ लिपीक, शिक्षण विभाग (माध्य), जिल्हा परिषद, यवतमाळ श्री.एस.आर. बोरकर हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, बाबा कंबलपोश उर्द हायस्कुल, आर्णी श्री.एफ.एम. खान हे हजर आहेत.

अर्जदार यांचे वतीने हजर असलेले त्यांचे चिरंजीव श्री.मोहीन अहमद खान यांचे म्हणण्यानुसार अर्जदार हे आजारी असल्यामुळे ते सुनावणीस हजर राहु शकले नाही. अर्जदाराने दि.२९/०४/२०१०, ११/०५/२०१०, १७/०५/२०१० ला माहिती अधिकारी यांना अर्ज केले. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराने केलेले तीनही अर्ज त्यांना मिळालेले नाही व त्यामुळे अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली नाही. तरी, हया आयोगासमोर तीनही अर्जाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांना पुरविण्यात आल्या. जन माहिती अधिकारी हे सदर अर्जाचे अवलोकन करुन त्याची माहिती अर्जदाराला ३ आठवडयाच्या आंत रजिष्टर पोष्टाने अर्जदाराला पाठवतील. अर्जदाराचे प्रतिनिधी यांनी माहिती व्यक्तीशः मागितली त्यामुळे ते टपालाचा खर्च पुरविण्यास तयार नाही. तसेच अर्जदारास लागणा-या माहितीकरिता अर्जदार रु. २ प्रती प्रमाणे पैसे भरण्यास तयार आहे. तरी, उत्तरवादी हे त्यांना तशी पोच देतील. अर्जदाराला माहिती मिळाल्यानंतर समाधान झाले नाही तर अर्जदार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार**

**तक्रार क्र.६९२/६/२०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा तक्रारकर्ता**
श्री.रवि गोविंदराव इंगळे,
संपादक साप्ता. नाथ नगरीची खबर,
मेन रोड, मंगरुळपीर, जि.वाशिम.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कारंजा,
ता.कारंजा (लाड), जि.वाशिम.

२. जन माहिती अधिकारी तथा
स्थानिक मंडळ कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कारंजा,
ता.कारंजा (लाड), जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक ०३/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा तक्रारकर्ता श्री.रवि गोविंदराव इंगळे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कारंजा श्री.बि.एस. तायडे हे हजर आहेत.

अर्जदाराची तक्रार क्रमांक ६९२/२०१० च्या अनुषंगाने हया आयोगाने आज दि.०३/१२/२०१० रोजी सुनावणी घेतली. अर्जदाराची तक्रार दिनांक २६/०७/२०१० रोजीची आहे व त्यात हया आयोगाने याआधी व्दितीय अपिलात दिनांक २१/०६/२०१० रोजी आदेश पारीत केला व त्यामध्ये प्रथम अपिला सुनावणी घेवुन अर्जदाराला माहिती पुरविण्यासंबंधी कार्यवाही करण्याबाबत आदेश झाला. त्यानंतर दि. १४/०७/२०१० रोजी प्रथम अपिलात सुनावणी घेवुन आदेश पारित केला व त्यात ३० ऑगष्ट २०१० अखेर जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला माहिती देण्याचे कबुल केले. परंतु सदर माहितीचे कागदपत्र श्री.कंडारकर यांची विभागीय चौकशी संबंधाने उपविभागीय कृषी अधिकारी, वाशिम यांनी जप्त केले आहे, त्यामुळे अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली नाही. तरी सदर चौकशी आटोपताच अर्जदाराला माहिती पुरविण्यात येईल असे उत्तरवादी यांचे म्हणणे आहे. तरी, संबंधित तक्रारकर्ता हे दिनांक १४/०७/२०१० च्या अपिल निर्णयावर व्दितीय अपिल हया आयोगासमोर दाखल करु शकतात. त्यात जर विलंब झाला असेल तर त्याबाबत एक अर्ज करुन तो क्षमापीत करुन अपिल अर्जावर विचार करता येईल.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार**

**तक्रार क्र.६९३/७/२०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा तक्रारकर्ता**
श्री.रवि गोविंदराव इंगळे,
संपादक साप्ता. नाथ नगरीची खबर,
मेन रोड, मंगरुळपीर, जि.वाशिम.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मंगरुळपीर,
ता.मंगरुळपीर, जि.वाशिम.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
मंडळ कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मंगरुळपीर,
ता.मंगरुळपीर, जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक ०३/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा तक्रारकर्ता श्री.रवि गोविंदराव इंगळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे वरिष्ठ लिपीक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मंगरुळपीर श्री.व्हि.आर. राठोड हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, मंगरुळपीर श्री.आर.एस. इंगोले हे हजर आहेत.

सदर प्रकरणात हया आयोगाने अपिल क्रमांक १०२७/२००९ हया प्रकरणात दिनांक २१/०६/२०१० रोजी अपिल निकाली काढुन श्री.एस.एम. उलेमाले यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस केली होती. तसेच सुनावणीचे वेळी श्री.आर.एस. इंगोले, कृषी अधिकारी हे हजर होते. त्यांनी अर्जदाराला जी अपुर्ण माहिती दिली ती आजपासुन १५ दिवसाचे आंत उर्वरित माहिती पुरवावी असा आदेश दिला होता. त्यानंतरही अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली नाही व त्यामुळे अर्जदाराला हया आयोगासमोर दिनांक २६/०७/२०१० रोजी तक्रार करावी लागली व त्या तक्रारीच्या अनुषंगाने आज रोजी सुनावणी घेतली असता उत्तरवादी श्री.आर.एस. इंगोले यांचे म्हणण्यानुसार उर्वरित माहिती पुरविण्यात आली नाही कारण उर्वरित पुरविण्यात येणारी माहिती श्री.हिवराळे, मंडळ कृषी अधिकारी, श्री.जाधव, मंडळ कृषी अधिकारी, श्री.उलेमाले या तिघांकडुन दिनांक १५/०४/२०१०, ०२/०९/२०१०, १९/११/२०१० या तीन्ही तारखेला लेखी पत्रव्यवहार करुन सुध्दा माहिती न मिळाल्यामुळे अर्जदारास ते माहिती पुरवू शकले नाही. तसेच संबधित मंडळ कृषी अधिकारी यांनी कुठल्याच प्रकारचे उत्तर तालुका कृषी अधिकारी यांना दिले नाही म्हणुन अर्जदाराला कुठल्याच प्रकारची माहिती पुरविण्यात आली नाही व केव्हा पुरविण्यात येईल हे सुध्दा सांगता येत नाही.

वरील बाबीचा विचार करता या अधिनियमाच्या कलम १८ नुसार श्री.हिवराळे, श्री.जाधव, व श्री.उलेमाले या तीन्ही मंडळ कृषी अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. तसेच जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जिल्हा वाशिम यांना असा आदेश देण्यात येते की, वरील तीनही मंडळ क्रेषी अधिकारी यांचेवर त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमांचा भंग केल्याच्या कारणावरुन कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येते

खालील आदेश पारित करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**आदेश**

१. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जिल्हा वाशिम यांनी वरील तीनही मंडळ कृषी अधिकारी यांचेवर वर कार्यवाही करुन ३ महिन्याच्या आंत अहवाल सादर करावा. तसेच या आयोगाच्या दिनांक २१/०६/२०१० च्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सुध्दा या आयोगाला सादर करावा.
२. तसेच तालुका कृषी अधिकारी यांनी संबंधित मंडळ कृषी अधिकारी यांना माहिती पुरविण्याबाबत आदेशित करावे व ती माहिती मिळाल्यानंतर तालुका कृषी अधिकारी हे सदरची माहिती विनाशुल्क अर्जदाराला पुरवतिल.

वरील आदेश पारित करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जिल्हा वाशिम